# विश्वबंधुत्व

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे त्रैमासिक

जानेवारी – मार्च २०२४

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२४ अंक १

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | अ.क्र. | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | अध्यात्मविद्या – अभ्यास वर्ग | ३ |
| ३ | अड्यार डे | ६ |
| ४ | व्हाईस ऑफ द सायलेन्स आणि भावार्थ दिपिकेतील साम्य स्थळे | ७ |
| ५ | शांतता आणि संघर्ष | ११ |
| ६ | मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन वार्ता | १३ |


या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.

**प्रकाशक**
**अध्यक्ष**
**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

# संपादकीय

नमस्कार,

'विश्वबंधुत्व' हे द्वैमासिक मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे मुखपत्र आहे. फार वर्षांपूर्वी 'जागृती' ह्या नावाने प्रकाशित झालेल्या द्वैमासिकाचे कालांतराने 'विश्वबंधुत्व' असे नामकरण झाले होते. सन २०१९ च्या अखेरीस विश्वबंधुत्वाचा द्वैमासिक अंक प्रकाशित करणे सुरु झाले. कोरोना आपत्तीच्या काळामध्ये देखील अंक प्रकाशित झालेत. अपवादात्मक, काही अंक चार महिन्यात एकदा तर काही तीन महिन्यात एकदा असेही प्रकाशित झालेत. प्रत्येक अंक हा विश्वबंधुत्वाच्या वार्षीक व आजीवन सभासदांपर्यंत पाठविण्यात यायचा.

लेख तयार करणे किंवा मिळविणे, काही ठळक घटनांची लिखीत मांडणी करणे, ह्या सर्व लिखाणाचे मुद्रण करणे, प्रत्येक अंकाची बांधणी करणे आणि वर्गणीदार सभासदांच्या पत्त्यावर पोष्टाने पाठविणे ह्या प्रक्रियेमध्ये अनेक अडचणी येवू लागल्या. वर्गणी मिळविणे हे एक वेगळेच काम व्हायचे. नाममात्र वर्गणी असल्यामुळे सन २०२२-२३ पासून वर्गणी घेणेच बंद केले. मागील वर्षी मार्च-एप्रिलच्या अंकानंतर मुद्रण व प्रकाशन होवू शकले नाही. यास मीडीया व इंटरनेटच्या वाढल्या वापरामुळे सभासदांनी पण ह्याबद्दल (विश्वबंधुत्वाच्या प्रकाशनांबद्दल) फारशी विचारणा केली नाही. असे असले तरी, 'विश्वबंधुत्वाचे' महत्त्व आणि आवश्यकता कायमच लक्षात राहीली.

मराठी फेडरेशनच्या आळंदी येथील सप्टेंबर २०२३ च्या वार्षिक अधिवेशनात 'विश्वबंधुत्व' नव्याने प्रकाशित करण्याबद्दल सर्व सभासदांशी चर्चा झाली विचारविनिमय झाला. आपल्या बहूसंख्य सभासदांनी सकारात्मक प्रतिसाद देवून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन 'विश्वबंधुत्व' हे त्रैमासिक करावे आणि ऑनलाईन पद्धतीने सर्वांपर्यंत पोहचवावे असे मत मांडले. ह्याच सुचनेनुसार 'विश्वबंधुत्वा' साठी एक समिती नेमण्यात आली आणि अकोला लॉजचे बंधु डॉ. श्रीकांत उखळकर ह्यांनी ह्या त्रैमासिकाचे प्रमुख संयोजक व समन्वयक म्हणून कार्यभाग सांभाळावा असे ठरविण्यात आले. बंधू उखळकरांनी ह्यास त्यांची संमती दिली.

माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्चचा अंक अड्यार डेच्या दिवशी प्रकाशित होईल आणि त्यापुढील तीन-तीन महीन्यात एकदा अंक निघेल, साधारणत: व्हाईट लोटस डे (८ मे), फेडरेशनचे वार्षीक अधिवेशन (सप्टेंबर अखेर) आणि थिऑसॉफीकल सोसायटी स्थापना दिवस (१७ नोव्हेंबर) ह्या महत्त्वपूर्ण दिवसांची 'विश्वबंधुत्व' प्रकाशनाची निवड केली आहे. आणि ऑनलाईन पद्धतीने प्रत्येक अंकाची पीडीएफ (मुद्रण करण्यायुक्त पुस्तीका) सर्व सभासदांच्या व इच्छुकांच्या मोबाईल क्रमांक किंवा इ-मेल वर पाठवीण्यात येणार आहे. प्रियींगचे तंत्रज्ञान प्रत्येक शहरात सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे ज्यांना मुद्रांकित प्रत हवी त्यांनी ह्या पीडीएफ फाईलची प्रिंटीग करुन घ्यावी. ह्या कामी लॉजने देखील पुढाकार घेतल्यास दोन-तीन प्रती (प्रत्येक अंकाच्या) प्रिंटीग करुन लॉजमध्ये ठेवल्यास ज्यांना अंक वाचायचा असेल ते तो अंक नेतील आणि वाचन झाल्यास परत लॉजमध्ये आणून देतील.

'विश्वबंधुत्व' अंकामध्ये सभासदांचे आणि थिऑसॉफीकल सोसायटीतील अभ्यासकांचे लेख विचार लॉज वार्ता, इतर उपयुक्त सुचना व घोषणा किंवा घडामोडींची माहीती आणि लॉग व फेडरेशनने आयोजित केलेल्या आध्यात्मिक व सामाजिक (जसे की टी.वो.एस.) कार्याची माहीती देण्यात येईल. अंकामध्ये फोटोग्राफस् पण देण्यात येतील.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या मराठी थि-फेडरेशनच्या सभासदांनी प्रकाशित केलेल्या 'विश्वबंधुत्व' अंकाची गुणवत्ता वाढविण्याची व हे अंक समाजातील अनेकांपर्यंत पोहचविण्याची आपणांसर्वांची जबाबदारी आहे.

‘विश्वबंधुत्वाचा’ आानंद आापणासर्वांना घ्यायचा आहे. ह्या नवीन ऑनलाईन पद्धतीने तयार होत असलेल्या अंकांना शुल्क नाही. तसेच लिखित पानांची मर्यादा नाही. सर्व सभासदांनी आपापले विचार, मनोगत, लेख, माहीती इ. मनसोक्तपणे आणि सहजपणे लिहून काढून ती प्रकाशित करण्यासाठी पाठवायची आहे. लॉज पदाधिकाऱ्यांनी लॉजवार्ता नियमितपणे पाठवायच्या आहेत, उपक्रमांची माहीती द्यावयाची आहे आणि फोटोग्राफस् देखील पाठवायची आहेत.

‘विश्वबंधुत्व’ हे त्रैमासिक आपणापर्यंत आणणे हे वरवर वाटते तेव्हडे सोपे नाही. असे असले तरी ते आपणापर्यंत आणणे गरजेचे आहे. सामाजिक हिताच्यादृष्टीने अंक प्रकाशित होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ‘विश्वबंधुत्व’ मुद्रण व प्रकाशित करणाऱ्या प्रमुखांचे व समितीचे आभार मानायला हवेत. ‘विश्वबंधुत्वाचे’ अंक हे ब्रह्मविद्येचा अभ्यास त्यासंबंधी विचार मंथन, प्रचार व प्रसार करण्यासाठी उपयुक्त ठरतील हा आशावाद ठेवायला हवा.

अड्यार डे निमित्त आपणासर्वांना हार्दिक शुभकामना!

**– संजय पोटे**
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

## विनम्र आवाहन

विश्वबंधुत्वाचा पुढील अंक एप्रिल–जून २०२४ चा व्हाईट लोटस डे (८ मे) दरम्यान प्रसिद्ध करण्याचा मानस आहे, तरी सदर अंकासाठी लेख, लॉज वार्ता छायाचित्रांसह, टी.ओ.एस. कार्यक्रमांची माहिती इत्यादी मार्च अखेर पर्यंत पुढीलपैकी कोणत्याही एका माध्यमाद्वारे पाठवावे.

व्हॉटस्अप – ॲड. श्री. संजय पोटे, ७७४४९१०७८७
डॉ. श्रीकांत उखळकर, ७०८३९४५७९९

ई–मेल – sanjaypotey@gmail.com
shhrikantukhalkar@gmail.com

डाक – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन
९१८, शिवाजी नगर, गणेशवाडी,
डेक्कन जिमखाना, पुणे–४११००४
डॉ. श्रीकांत उखळकर
४, माता वैष्णवी अपार्टमेंट
ॲड. मुखर्जी बंगल्याजवळ,
राऊतवाडी, अकोला. ४४४००५

विश्वबंधुत्वासाठी लेख, वार्ता इत्यादी मजकूर मराठीतच पाठवावा, अंकामध्ये अपवादानेच एखादा लेख इंग्रजी भाषेत असू शकेल.

# आत्मविद्या–अभ्यासवर्ग

द पूना लॉज थिऑसॉफिकल सोसायटीने आत्मविद्येच्या म्हणजे थिऑसॉफिच्या कालबद्ध आणि सुनियोजित अध्ययनासाठी तीन महिने मुदतीचा आत्मविद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम आखून नोव्हेंबर २०२३ पासून त्याची सुरुवातही केली आहे. दर सप्ताहाच्या शनिवार–रविवारी पूना लॉजमध्ये हा अभ्यास वर्ग नियमितपणे चालू असून, बाहेरगावच्या अभ्यासूंसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. चालू अभ्यासवर्ग फेब्रुवारी २०२४ मध्ये संपल्यानंतर दुसऱ्या अभ्यासवर्गासाठी नोंदणी सुरु होईल. इच्छितांनी त्यासाठी बंधू श्री कौस्तुभ भडभडे, सचिव यांचेशी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

हा अभ्यासक्रम प्रामुख्याने धार्मिक/अध्यात्मिक जीवन डोळसपणे जगण्यासाठी उत्सुक असलेल्या तरुणाईसाठी सुरु केला आहे. आत्मविद्येच्या क्षेत्रात प्रवेश करु इच्छिणाऱ्या नवागतांना हा अभ्यासक्रम विशेष आवडेल. तथापि दीर्घकाळ अध्यात्मिक क्षेत्रात वावरत असलेल्या जेष्ठांसाठी तो ज्ञानार्जनाच्यादृष्टीन; लाभदायी वाटत आहे. विज्ञाननिष्ठ तर्कशुद्ध बुद्धीने मानवी जीवनाकडे पाहणाऱ्या आणि जीवनातील दैनंदिन समस्या आणि गहन प्रश्न यांची उत्तरे शोधणाऱ्या आस्तिक/नास्तिक जिज्ञासूंनाही हा अभ्यासक्रम चिंतनशील व प्रेरणादायी करील यात शंका नाही.

अभ्यासक्रम मर्यादित कालावधीचा असला तरी विषयांची व्याप्ती अथांग आहे हे विषयसूचींवर सहज दृष्टीक्षेप टाकला तरी लक्षात येईल. विश्वाची निर्मिती, जीवसृष्टीची उत्पत्ती, ईश्वर–देव, जन्म–मृत्यू, मानवेतर विविध जीव–योनी आणि त्यांची सर्वसमावेशक निसर्गनिर्मिती उत्क्रांती–योजना कर्म आणि पुनर्जन्म यांचा शास्त्रोक्त, विज्ञाननिष्ठ अन्योन्य संबंध, सर्वांगीण मानवी उत्कर्षासाठी योगसाधना आणि सिद्धी अशा विविध विषयांची धर्मशास्त्र आणि विज्ञान यांच्या आधारे मुद्देसूद चर्चा हे ह्या अभ्यासक्रमाचे जिज्ञासूंना भावणारे असे वैशिष्ट्य आहे.

पदार्थ विज्ञान मानवी ज्ञानेंद्रियांना आणि त्यांच्या संवेदनातून मेंदूला ज्ञात होणाऱ्या विश्वाचा आणि त्या विश्वाचा सर्व ज्ञात घटकांचा अभ्यास करते. परंतु दृष्य विश्वापलिकडे असलेल्या आणि दृष्याचा अविभाज्य घटक असलेल्या अदृष्य विश्वाचा आणि जीवसृष्टीचा विचार ते करीत नाही. त्यामुळे पदार्थविज्ञानाने होणारे ज्ञान सर्वसमावेशक नाही, किंबहूना ते फारच मर्यादित आणि अंशात्मक म्हणूनच पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासूंनाही हा अभ्यासक्रम त्रुटी भरुन काढणारा, सर्वांगिण– व्यापक ज्ञान देणारा आहे.

ज्ञान दोन प्रकारचे असते परा ज्ञान आणि अपरा ज्ञान. अपरा ज्ञान म्हणजे ज्ञानेंद्रिये जे ग्रहण करतात असे बाह्य ज्ञान जे इतरांनी धर्म, तत्त्वज्ञाना, विज्ञान इत्यादी नानाविध स्वरुपात संकलित केलेले असते. कीर्तने, व्याख्याने, प्रवचने इ. स्वरुपाच मांडलेले असते आणि त्याच्या अध्ययन श्रवणातून अपरा ज्ञान प्राप्त होते. परा ज्ञान अंतरंगातून स्फुरलेले आणि अनुभवलेले प्रत्यक्ष ज्ञान जे मेंदू आणि मन, विचार आणि स्मृती यांच्यावर आधारीत नसते. त्यादृष्टीने पाहिले की आत्मज्ञान ही पराविद्या होय. जसे योगसाधनेमध्ये समाधिस्थ झालेल्या योग्याला निर्मनी अवस्थेत होणारे ज्ञान अपराविद्या एकाकडून दुसऱ्याला प्राप्त होते; परंतु पराविद्या योग साधनेद्वारा योग्याला स्वत:च अनुभवावी लागते. ती शब्दातीत असते.

आत्मविद्या म्हणजे आत्म्याविषयीचे ज्ञान किंवा आत्म्याचे ज्ञान असे शब्दफोड करुन म्हणता येईल. पतंजलींनी ईश्वराचे वर्णन सर्वज्ञ असे केले आहे आणि मानवी आत्मा म्हणजे त्या ईश्वराचा अंश प्रत्येक मानवामध्ये वास करतो. त्यामूळे स्वाभाविकच आत्म्याच्या ठायी सर्वज्ञता असते. आत्माअमर असतो आणि देह मर्त्य असतो, प्रकृती–निर्मिती असतो. आपल्याला सकृतदर्शनी दिसतो तो स्थूल देह अन्न, पाणी, हवा यांवर पोसणारा, आपण आपले मन भावना आणि विचार – जे दिसत नाही. ते देहाचेच अंग मानतो. आत्मज्ञानाच्या

अज्ञानामुळे हे घडते. मानव जातीच्या आरंभापासून ऋषि–मुनींनी योगसाधनेने अतींद्रीय ज्ञान प्राप्त केले. त्यांच्या तपश्चर्यतून, मनन–चिंतनातून त्यांना 'कोऽहम्' असे उत्तर मिळाले. ईश्वरी अंश असलेले आत्मरुप हेच आपले 'स्वरुप' हे त्यांनी ओळखले. ह्याच आत्मज्ञानाने अखिल विश्व आणि मानव यांच्या जडणघडणीमधील विलक्षण साम्य आणि अतूट नातेसंबंध लक्षात येतो. आपल्याला दिसणारे बाह्य जग म्हणजे भुलोकपृथ्वी आणि सभोवतालचे वातावरण पण भूलोकाच्या आतबाहेर मिळून गेलेले अन्य सूक्ष्म, सूक्ष्मतर लोक पृथ्वीला व्यापून आहेत. असेच सूक्ष्म लोकांमध्ये वावरुं शकणारे सूक्ष्म, सूक्ष्मतर देह मानवाला लाभलेले आहेत आणि त्यामुळेच भिन्न भिन्न देहांच्या माध्यमातून आत्म्याला भिन्न भिन्न लोकांमध्ये व्यक्त होणे शक्य आहे. उदाहरणार्थ आपल्या वासना–भावना किंवा विकार–विचार ह्या सूक्ष्म देहांत उत्पन्न होवून व्यक्त होतात आणि इतरांच्या सूक्ष्म देहापर्यंत त्याच्या लोकांमधून कंपनक्रियेने पोहोचतात. भावना–विचार जाणवतात पण दिसत नाहीत, कारण भावनिक–वैचारिक व्यवहार अदृष्य,सूक्ष्म लोकांत घडतात.

आत्मविद्या आपणास विश्व आणि मानव यासंबंधी वस्तुस्थिती पटवून देते. आपल्या देहाला 'मी' समजणे आपले बाह्य व्यक्तीमत्त्व हेच आपले संपूर्ण अस्तित्व मानणे हा भ्रम आहे, हे केवळ अर्धसत्य आहे हे आत्मविद्येच्या अध्ययनाने पटते. हीच माया, हेच अज्ञान, हेच मानवी दु:खाचे मूळ कारण याची आत्मज्ञानाने प्रचिती येवूं लागले. आपल्या मूळ आत्मभावातील दैवी–अध्यात्मिक गुणसंपत्तीची ओळख पटते. स्वत:ला नीट ओळखणे किती आवश्यक आणि किती अवघड आहे हे उमजते; जीवन प्रवासाची नेहमीची धोपट वाट सोडून एका नव्या वळणावर आपण येवून पोहोचतो. जग वरवर दिसते त्यापेक्षा कितीतरी विशाल आहे आणि त्या जगात मानवी जीवनाला फार मोठा अर्थ आहे हे जाणवते. आतापर्यंतचा प्रवास देहांच्या प्रवृत्तीनुसार झाला, यापुढे त्या स्वाभाविक प्रवृत्तींना मुरड घालून, निवृत्तीचा मार्ग आपणास खुणावतोय हे लक्षात येते. पण ही कृति म्हणजे कृतिशील जीवनापासून 'रिटायरमेंट' नव्हे.

आतापर्यंत आपण देहाने, देहासाठी जगलो. यापुढे देहबुद्धीला विराम देवून, देहाच्या देव्हाऱ्यात आत्मारामाची प्रतिष्ठापना करावयाची. आपला स्थूल देह आणि सूक्ष्म आणि सूक्ष्मतर देह हे सर्व केवळ आत्म्यासाठी साधनमात्र असून त्यांचे प्रमुख किंबहूना एकमेव कार्य आत्म्याच्या दैवी गुणधर्माच्या अविष्कारासाठी सदैव सहाय्यभूत होणे हे आहे. परंतु हे देह अद्याप आत्मसमर्पणासाठी पुरेसे विकसीत झालेले नाहीत. त्यामुळे त्याची योग्य वाढ आणि विकास हे निवृत्तीमार्गावर वाटचाल करणाऱ्या साधकासाठी पहिले कर्तव्य ठरते. यापूर्वी अज्ञानामुळे मायेच्या प्रभावाखाली राहून देह म्हणजेच 'मी' असे मानून देहबुद्धीने वागून देहांचा आत्मविकासासाठी योग्य वापर झाला नाही, किंबहूना देहवासनांच्या तृप्तीसाठी त्यांचा गैरवापर जास्त झाला हे जेव्हा साधकाच्या लक्षात येते, त्यावेळी देहांच्या शुद्धीकरणाची तीव्रतेने गरज भासू लागते. आतापर्यंतच्या वाटचालीत देहांच्या कलाने वागून, देहतृष्टी करताना आपण अनेक अयोग्य कर्मे केली, अनेक वाईट सवयींच्या आहारी गेलो आणि परिणामी आपल्या आत्मविकासाच्या आड आलो. आपल्या मार्गात आपणच निर्माण केलेल्या अडचणी व अडथळे प्रथम आपण दूर केले पाहिजेत यांची प्रकर्षाने जाणीव होते.

सूज्ञ मानव स्वत:ची जबाबदारी ओळखून निवृत्तीमार्गावर कार्यतत्पर होतो. हे कार्य असते विविध देहांच्या शुद्धिकरणाचे आणि विकासाचे त्यासाठी केवळ आचरण आणि संभाषण यामधील बदल पुरेसा नाही. अंतर्बाह्य बदल भावनिक वैचारिक पातळीवरही आवश्यक आहे. साधकाला आत्मपरीक्षण करुन स्वत:चे गुणदोष ओळखून, कोठे बदल आवश्यक आहे हे ठरवावे लागते. आत्मविकासाला प्रतिकूल असणारे दोष, दुर्गुण, व्यसने निर्धारपूर्वक सोडावी लागतात. त्यापासून निवृत्त होते जमले की, आत्मविकासासाठी पोषक अशा सत्यवृत्ती जोपासणे शक्य होते. इतरांचे दोष चटकन डोळ्यात भरतात, पण स्वत:चे दोष लक्षात येणे आणि कोणतेही समर्थन न करता ते

स्वीकारणे वाटते तेवढे सोपे नाही. दु:संग टाळणे व सत्संग वाढवणे त्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. अष्टांग योगामध्ये, यमनियमांची भक्कम पायाभरणी करुन योग साधनेला आरंभ करावा लागतो तो अशा शाब्दिककरणासाठी.

देहांचा वापर जेवढा जास्त तेवढी त्यांची वाढ वेगाने होते. हा वापर जेवढा योग्य कार्यासाठी होईल तेवढे त्यांचे शुद्धिकरण आणि विकासही वेगाने होतो. देहांमध्ये होणारा बदल क्रमश: आणि हळूहळू होतो. ही साधना श्रद्धापूर्वक दीर्घकाळ, अखंडपणे चालू ठेवली ती होणारे बदल दृग्गोचर असतात. पण केलेले योग्य प्रयत्न कधीही वाया जात नाहीत. हे साधकाने विसरु नये. बदल प्रकृतिधर्मानुसार होत असतो. सत्त्व-रुज-तम हे प्रकृतिचे अंगभूत गुणधर्म त्यांचे परस्पर प्रमाण प्रयत्नपूर्वक बदलता येते. तमोगुणाचे प्राबल्य असताना कोणताही बदल अवघड असतो. परंतु प्रबळ इच्छाशक्तीने त्यावर मात करता येते. रजोगुणाचे प्राबल्य कृतिशीलतेमध्ये प्रतिबिंबीत होते, आणि तिन्ही गुणांचा समतोल सत्त्वगुण वाढीला लावण्यास उपयुक्त ठरतो. आत्म्याचेही स्वरुप त्रिवीध आहे. आत्म-बुद्धी-मनन अशा तीन सूक्ष्म जाणीवेच्या पातळ्यांवर आत्मभाव इच्छा-ज्ञान-कृति यांच्या रुपाने व्यक्त होतो. एकाच अव्यक्त ब्रह्मापासून व्यक्त होणाऱ्या पुरुष आणि प्रकृतिची भाव आणि गुणवैशिष्टये विविध भावगुणांच्या संयोगातून प्रत्येक व्यक्तिमध्ये वैशिष्ट्यपूर्व स्वरुपात व्यक्त होत असतात. म्हणूनच प्रत्येक जीवात्मा एकमेवद्वितीय असतो. आणि तो श्यैक्किक एकमेकाद्वितीयला पूर्णपणे विकसित करुन त्याचा अविष्कार घडविणे हीच अध्यात्मिक साधना होय. त्यासाठी सर्व देहांवर आत्म्याचे संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित होणे व देहांची स्वतंत्र जाणीव संपूर्ण आत्मजाणीवेशी ती पूर्णपणे एकरुप होणे हे आत्मविद्येचे उद्दिष्ट आहे.

**– बंधु श्री. बी. डी. तेंडूलकर, पुणे**

---

# अकोला लॉज वार्ता

लॉजची सभा दर रविवारी सकाळी ९.३० वा. होते सभेत थिऑसॉफीशी निगडीत विषयावर चर्चा आयोजित केली जाते. चर्चेचा विषय व्हॉटस्अप गृपवर सभेपूर्वी तीन दिवस आधी कळविला जातो. चर्चेमध्ये सर्व उपस्थित बंधू/भगिनी सहभागी होतात.

साप्ताहीक सभेत जेष्ठ बंधू श्री. एस. के. कदम उपनिषदांवर विवेचन करतात. सदर विवेचनाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले जाते.

थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस चित्रक गृप अकोला तर्फे खालील उपक्रम राबविले गेले.

दि. १७ नोव्हें. २३ रोजी मेळघाटातील रोटाखेडा येथे आदिवासी वस्तीत ५१ सोलर कंदिल वाटप.

दि. १ जानेवारी २४ रोजी चूनाखेडी ता. तेऱ्हारा या आदिवासी गावात ५१ ब्लॅकेटस् वाटण्यात आले. TOS च्या उपक्रमासाठी दत्त मेडीकल्स् अकोला यांची उदार देणगी लाभली.

दि. १५ जानेवारी रोजी जि. प. शाळा गोपालखेड येथे बाल साहित्याचा ४० पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.

दि. २० जानेवारी रोजी साने गुरुजी विद्यालय संतोष नगर अकोला येथे बाल साहित्याचा ४० पुस्तकांचा संच भेट देण्यात आला व सूजाण पालकत्व या विषयावर मार्गदर्शन डॉ. योजना अंबाडकर (Tos भगिनी) यांनी केले.

दि. १७ फेब्रुवारी अड्यार डे निमित्त खूली निबंधलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेमध्ये एकूण ७५ निबंध प्राप्त झाले.

दि. १३ फेब्रुवारी रोजी जि.प. शाळा, हिंगणी ता. तेल्हारा येथे बालसाहित्याचा ४० पुस्तकांचा संच भेट व ४० विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी डॉ. योजना डागा अंबाडकर व डॉ. राहूल अंबाडकर ह्यांनी केली. तसेच पालकांना मार्गदर्शन केले.

# अड्यार डे १७ फेब्रुवारी

थिऑसॉफिकल सोसायटी दरवर्षी १७ नोव्हेंबरला स्थापना दिवस, १७ फेब्रुवारीला अड्यार डे आणि ८ मे White Lotes Day साजरा करते.

हेनरी स्टील ऑलकाट यांचा ऑगस्ट -२, १९३२, ऑरेंज न्यू जर्सी अमेरिका येथे जन्म झाला आणि त्यांचे निर्वाण १७ फेब्रुवारी १९०७ ला अड्यार मद्रास (चेन्नई) येथे झाले. हेलेना पेट्रोना क्लाव्हट्स्की (रशियन) (H.P.B.) हेनरी स्टील ऑलकाट यांनी १७ नोव्हेंबर १८७५ ला थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना न्यूयार्क येथे केली. त्यांचे सोबत विल्यम कलान जज (१८५१-१८९६) होते. अड्यार डे १७ फेब्रुवारीला संस्थेचे संस्थापक ऑलकाट यांचा निर्वाण दिन म्हणून प्रथमच १७ फेब्रुवारी १८२२ ला डॉ. ॲनी बेझंट यांनी Madame de Manziarly यांच्या सूचनेप्रमाणे साजरा केला. कर्नल ऑलकाट यांनी Old Diary lives हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. कर्नल ऑलकाट यांनी न्यूयार्क कृषि पत्रीकेचे संपादक म्हणून १८५८-६० या कालावधित केले. आरमार व सैन्य यांचे Special Commission वर (१८६३-६६) कार्य केले. बार कौन्सिलमध्ये १८६६ मध्ये कार्यरत होते. ते एक तत्वचिंतक होते. भगवान बुद्धाविषयी व बौद्ध धर्माविषयी तसेच भारतातील आत्मविद्या, ब्रह्मविद्या या Science of Consiciousness तत्वज्ञानाने आकर्षित झाले. त्यामुळे थिऑसॉफिकलचे न्यूयार्क येथील मुख्यालय अड्यार चेन्नई येथे स्थानांतरीत केले. HPB आणि ऑलकाट भारतात राहून जगभर सोसायटीचा प्रचार/प्रसार करत होते. नयूयार्कला अमेरिकेचे सोसायटीचे कार्य जज यांचेकडे सोपविले. त्यांनी सिलोन मधील अंगारिका धम्मपाल यांचे सोबत लंका, जपान, अमेरिका येथे प्रवास केला. सिलोनमध्ये शाळा काढल्या. आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचेशी संपर्क आला. पौर्वात्य तत्वज्ञानाचा प्रसार पाश्चात्य देशात केला आपले संपूर्ण आयुष्य गरिब, दीनदुबळे लोकांची सेवा करण्यात अर्पण केले. १८९१ मध्ये HPB च्या निर्वाणानंतर सुद्धा संस्थेचे कार्याचा प्रसार केला. अशा या महात्म्यांच्या निर्वाणीचा दिवस थिऑसॉफिकल सोसायटीच्या द्वितीय अध्यक्षा डॉ. ॲनी बेझंट यांनी १९२२ पासून साजरा केला. त्यादिवशी या महात्म्यास अभिवादन करण्यात येते.

याशिवाय १७ फेब्रुवारीला सोसायटीसंबंधी महात्म्यांना अभिवादन करण्यात येते.

१) १७ फेब्रुवारी हा जे. कृष्णमूर्ति यांचा निर्वाण दिन आहे. (१८९५-१९८६)

२) Leadbeater यांचा जन्म दिवस (१७ फेब्रुवारी)

३) जिओनार्दो ब्रुनो (१५४८-१६००) दक्षिण इटलीमध्ये जन्मला त्याने पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे विज्ञानाद्वारे पटवून देण्याचा प्रयत्न केला. ब्रुनोने बिनशर्त माफीची अट नाकारली त्याला १७ फेब्रुवारी १६०० ला वधस्तंभावर जाळून मारले. सत्यासाठी मृत्यू पत्कारला.

**– बंधु एस. के. कदम, अकोला.**

# व्हाईस ऑफ द सायलेन्स आणि भावार्थ दिपिकेतील साम्य स्थळे

थिऑसॉफीचा आणि संत ज्ञानेश्वरांचा मोठा ऋणानुबंध आहे .HPB नि त्यांच्या Voice of the Silence या महत्वाच्या ग्रंथात ज्ञानेश्वरीचा उल्लेख वेळोवेळी केलेला आहे. HPB म्हणतात The Book of the Golden precepts ज्याच्या आधारे Voice of the Silence हा ग्रंथ लिहिला आहे यातील मूळ आणि मोठा भाग हा ज्ञानेश्वरी या ग्रंथात आलेला आहे.त्यांच्या शब्दात....

Yes Its maxims and ideas however noble and original are often found under different forms of Sanskrit works such as the Jnyaneshwari that superb mystic treatise......

ज्ञानेश्वरी हा ब्रह्मविद्या कथन करणारा ग्रंथ आहे इये मराठीचिये नागरी ब्रह्मविदेचा सुकाळू करी किंवा,......

सहज ब्रह्म रसाचे पारणे
केले अर्जुनालागी नारायणे ।
कि तेची अवसरे पाहुणे
पातलो आम्ही ।।

आम्हा ब्रह्मविद्वेच्या सर्व उपासकांचे ध्येय आहे ब्रह्मज्ञान/आत्म ज्ञान प्राप्ती. ब्रह्मज्ञान प्राप्ती एवढी सोपी नाही संत तुकाराम महाराज म्हणतात ....

ब्रह्मज्ञान जरी होय उठाउठी
तरी का हिंपुटी वेदशास्त्रे
याजसाठी जप
याजसाठी तप
व्यासेही अमूप ग्रंथ केले.

यासाठी विशिष्ठ पात्रता लागते. माऊली म्हणतात

अर्जुनाचेनि पांती परिसणया योग्य होती
कृपा करुनी संती अवधान दीजे ।।

ब्रह्म ज्ञान प्राप्तीतील मोठा अडथळा आहे. चित्ताची निर्वासन स्थिती. ती महाकठीण आहे.

ब्रह्मइंद्रिया गोचर नसे /पण गुण गेलिया डोळा दिसे.

विषयांचे सेवन करणे हा इंद्रियांचा स्वभाव आहे. अनंत जन्मापासून विषयाकडे धावणाऱ्या चित्ताला वळवणे एवढे सोपे नाही.

विषय विषयाचा परीपाडू गोड परमार्थ लागे कडू
कडू विषय तो गोडू जीवाशी जाहला ।।
पाहे पा दुध पवित्र आणि गोड
पासीच त्वचेचिया पदरा आड ।
ते अव्हेरुनी गोचीड रुधीर सेविती ।।

इंदिर्ये विषय सेविती तेथ हर्ष शोक उपजाती
तेथे सुख आणि काही दुख हि दिसे ।।
या इंद्रियांचा स्वामी मन आहे ...
मन षश्स्तानी इंद्रियांनी प्रकृती स्थानी कर्षति.
मनाला HPB नी KING OF ALL SENSES असे म्हटले आहे.

मनालाच अंतकरण संबोधले आहे (मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार)

Voice of the Silence (आत्म, बुद्धी, मानस, काम मानस ) मध्ये HPB म्हणतात....

Lower mind is the slayer of the real. O disciple slay the slayer. मनाला मारून टाक, त्याचा वध कर असा त्याचा अर्थ नाही त्याचा खरा अर्थ आहे. मनाला जिंकणे जरुरी. Conquer the mind (त्यासाठी अभ्यास आणि वैराग्य याची गरज) here be stirrors

संत तुकाराम म्हणतात.....
सोपे आहे सोपे आहे मन सहाय झालीया ।
किंवा बन्ध अथवा मोक्ष मनची कारण।।

HPB म्हणतात मनातील वासना समूळ नष्ट झाल्याशिवाय ज्ञान प्राप्ती नाही

We are aiming at nothing less than the complete destructions of the Whirlpools of the Lower mind.

ब्रह्म रस गोडी तयासी फावली
वासना निमाली समूळ ज्याची.
वासनेला समूळ नष्ट करणे मोठ कठीण कार्य आहे.
कवियत्री बहिणाबाई मनाबद्दल म्हणते....
मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला फिर येत पिकावर ।।
मन जहरी जहरी याच न्यार रे अंतर
आरे इचू साप बरा त्याले उतारे मंतर ।।
मन पाखरू पाखरू त्याची काय सांगू मात
आता होत भुईवर गेल गेल आभायात ।।
देवा अस कस मन अस कस रे घडल
कुठे जागेपणी तुले अस सपान पडल ।।
संत ज्ञानदेवांनी मनाला एका अभंगात खूपच सुंदर उपदेश केलेला आहे.
रुणुझुणु रुणुझुण रे भ्रमरा
सांडी तू अवगुण रे भ्रमरा ।।
चरण कमळदळू रे भ्रमरा ।।
भोगी तू निश्चळु रे भ्रमरा ।।
सुमन सुगंधु रे भ्रमरा
परिमळू विद्धाधू रे भ्रमरा ।।
सौभाग्य सुंदरु रे भ्रमरा ।।
बाप रखुमा देविवरू रे भ्रमरा

आपल्या पंचमहाभूतात्मक देहाचा सारथी मन आहे त्यालाच माऊली नि भ्रमराची उपमा दिली आहे. भ्रमर जसे या फुलावरून त्याफुलावर /झाडावर सतत इकडून तिकडे भ्रमण करीत असते त्या प्रमाणे माणसाचे मन सुद्धा कधीही स्थिर नसते

अनंत बुद्धीचे तरंग क्षण क्षणा पालटे रंग
धरू जाता संग तव तो होय बाधक

सतत विषयाकडे धावणे हा मनाचा मोठा अवगुण आहे. मनाला कितीही सांगा कामाकडे जाऊ नको, क्रोधाकडे जाऊन नको, लोभाकडे जाऊ नको पण प्रसंग आला कि ते विषय गटारात जाणारच. प्रत्येक विकार हा एक पर्वत आहे. कामावर विजय मिळविणे फार कठीण यावर विजय मिळविला चिरंजीव हनुमंत रायानी

काम घातला बांदोडी
काळ नेला देशो धडी ।
ऐसा प्रतापी गहन
कपि कुळी हनुमान ।।

लोभ काहीच नाही सीतामातेने दिलेला रत्न हार फोडून राम शोधला.

क्रोध – क्रोधामुळे राजा परीक्षिती काय स्थिती झाली हे आपणाला विहीत आहे.

काम क्रोध लोभ जायचे अंतरी
नाही अधिकारी ऐसा येथे ।।

संत ज्ञानेश्वर मनाला म्हणतात हे अवगुण सोडण्यासाठी तू सद्गुणाची कास धर

त्यासाठी तू सत्संगती कर. ज्याने सहाचा अंत केला तो संत त्याची संगती कर.

संत चरणरज लागता सहज
वासनेचे बीज जळूनीजाय ।।
चरण कमळदलु रे भ्रमरा

विकारांच्या घाणीत फिरल्याने जे मन दुषित झाले होते ते मन सत संगतीने सुमन बनते. (सुमन सुगंधु रे भ्रमरा)

संतानी सरता केलो तैशा परी
चंदनाने बोरी व्यापियेला ।।
परिसा परीस अगाध लेणे
चिंतामणी ठेंगणा ।।

असंगतीतून सत् संगतीत जात ते मन स्थिर होऊ लागते. मनाला जसी संगती द्याल तसे ते बनते. संत तुकोबा म्हणतात

गोविंद गोविंद मना लागलीया क्षंद ।।
मग गोविंद ते काया भेद नाही देवा तया ।
तुका म्हणे अळी झाली भिंगुरटी सकळी ।

विषयाचा त्याग करून त्या विषयी निष्ठूर झालेले व ब्रह्म ज्ञान प्राप्तीसाठी तळमळणारे कोमल चित्तच ब्रह्म ज्ञान प्राप्ती करून देऊ शकते. संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात ....

ऐसे हळूवारपण येईल
तरीच हे उपेगा जाईल ।।
एरव्ही गोठी होईल ।।
मुक्या बहिरीयाची ।।

संपूर्ण विषय त्याग करण्यासाठी त्याचे विधीने सेवन जरुरी आहे.

विधीने सेवन विषय त्यागाते समान ।।

आपले महात्मे, संत, थिऑसोफी आपल्याला सतत जागे करते परंतु आपण जागे होत नाही. संत एकनाथांचा जोगी नावाचे एक भारुड आहे ते म्हणतात..

जागरे जाग दादा मोठी गडद अंधारी
घर ते सामसूम चोर बैसले द्वारी ।।
गाफील निज्कामा नेईल गाठोडी सारी ।।
मग तुज जोड कैसी करशील मजुरी ।।
आत्ता तरी पुढे हाची उपदेश
नका करू नाश आयुष्याचा
सकळांचे पाया माझे दंडवत
आपलाले चित्त शुद्ध करा ।।

चित्त शुद्ध करणे हाच ब्रह्मज्ञान प्राप्तीचा खरा उपाय आहे.

ब्रह्मज्ञान होणे सोपे आहे पण चित्त निर्वासन होणे कठीण आहे म्हणून मुक्ती किंवा मोक्ष दुर्लभ आहे. -

**– बंधु डॉ ए.एस. सोनोने, अकोला.**

---

# ठाणे लॉज

ठाणे लॉजची साप्ताहिक सभा प्रत्येक रविवारी सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत संपन्न होते.

१. ठाणे लॉजचे एकूण २६ सदस्य आहेत. सभेमधील उपस्थिती २०-२२ असते.

२. प्रत्येक ३ महिन्यांनी ठाणे व डोंबिवली लॉजची संयुक्त सभा होते.

३. सभा शक्यतो बंधू जितेंद्र ठाकूर यांच्या घरीच होतात, पण सदस्यांनी इच्छा व्यक्त केल्यास त्यांच्या घरीही घेतल्या जातात.

४. साप्ताहिक सभांमध्ये आजपर्यंत थिऑसॉफिकल प्रार्थनेचा अर्थ, सर्व धर्म प्रार्थना व त्यांचा अर्थ, थिऑसॉफिकल सभांचे महत्त्व आणि माहात्म्य, थिऑसॉफिकल गुरुजनांची माहिती, गाण्यांमधून भावग्राही रसग्रहण, जीवनाचे अंतरंग, थिऑसॉफिमध्ये साजरे करण्यात येणारे दिवस, बुद्धपौर्णिमेचे महत्त्व, भक्ती-योग-ज्ञानमार्ग, साधकांचे अनुभव आदी अनेक विषयांवर क्रमश: वाचन-चिंतन-मनन केले जाते.

५. आवश्यकतेनुसार रुग्णांसाठी, विश्वशांतीसाठी, समाजहितासाठी प्रार्थना केली जाते.

६. दिनांक २६-११-२०२३ रोजी लॉजने राष्ट्रीय व्याख्याते व उज्जैनच्या विक्रम लॉजचे अध्यक्ष बंधू अरविंद नरवरे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. विषय होता spiritual laws of success. या व्याख्यानाला ठाणे व डोंबिवली लॉजचे सर्व सदस्य व निमंत्रित मिळून ३५ लोक उपस्थित होते.

७. लॉजकडून वेळोवेळी लोकहिताची कामेही केली जातात.

# शांतता आणि संघर्ष

वाराणसी (उ.प्र.) येथे दि. ५ ते ७ मार्च २०१० रोजी आयोजित ‘शांतता आणि संघर्ष’ या विषयावरील परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी राधा बर्निअर, इंटरनॅशनल प्रेसिडेंट (१९८२–२०१३) यांनी केलेल्या भाषणाचा अनूवाद.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या इंडीयन सेक्शनच्या कार्यक्रमाला अनेक वर्षांनी येण्याचा योग आला त्याचा मला अतिशय आनंद होतो आहे हे सर्वप्रथम सांगितले पाहीजे. हा आनंद व्यक्त केल्याशिवाय इतर काही बोलणे योग्य होणार नाही.

येथे आज आपण अशा विषयावर चर्चा करण्यासाठी जमलो आहोत जो आपणासर्वांसमोर आहे. आपण असा विचार करु नये की हा विषय एक सामान्य विषय असून माझ्या व्यतिरीक्त सर्व लोकांनी संबंधित आहे, आपण वैयक्तिकरित्या संघर्षापासून मुक्त असून उर्वरीत जगाच्या उद्देशातून समस्या निर्माण होतात. ही प्रवृत्ती अनेकांची आहे.

संघर्ष कुठे निर्माण होतो? प्रथमत: याचा विचार व्हायला हवा. असे दिसून येते की लोकांमध्ये विविध कारणांमुळे संघर्ष आहे. खरेच इतकी कारणं आहेक कां? की अज्ञान किंवा स्वार्थ हे एकच कारण आहे. वस्तूत: दोन्ही एकच आहेत किंवा खरोखरच संघर्षाची विविध कारणे आहेत का– लोकांमधील संघर्ष, निसर्ग आणि मानवातील संघर्ष आणि जगामध्ये सर्वत्र दिसतो आहे तो संघर्ष.

आपली समाधान प्राप्त करण्याची ईच्छा पूर्ण झाली आहे कां हे बघण्याची ईच्छा मनूष्यात आहे कां? त्याच्या योग्यतेच्या विचारानुसार त्याच्या आजूबाजूला घटना घडत आहेत कां? जवळपास प्रत्येकाला याची कल्पना आहे. संघर्ष निर्माण होऊ शकतो त्याचे कारण त्याची संकल्पना भेदपूर्ण आहे. आपण सर्वप्रथम संघर्षाच्या प्रश्नाचा विचार करु जो सर्वांना भेडसावत आहे. एखाद्या व्यक्तीला संघर्षाची जाणीव नसतांनाही संघर्ष सुरुच असतो. यामुळेच संघर्ष उभा राहतो तेव्हा त्या व्यक्तीला त्यापासून अलिप्त राहणे कठीण जाते. आपणापैकी प्रत्येक जण आपल्या आत डोकावून हे जाणू शकतो का की संघर्षमय विविध बाजूंचा शेवट करण्यातून मुळात संघर्षाचा शेवट होऊ शकतो, की संघर्षाला अनूकुल गोष्टींना विरोध संघर्षाचा अंत करु शकतो का? याबाबतीत कोणत्याही निष्कर्षाप्रत पोहचण्यापूर्वी आपल्याला स्वत:कडे फार काळजीपूर्वक बघितले पाहीजे.

आज जगात काय चाललय याकडे आपण कळी देवू या. आज प्रत्येक व्यक्ती शांततेच्या बाजूने असल्याचा विश्वास ठेवतो किंवा इतरांनी तसा विश्वास ठेवावा असे त्यास वाटते. एखाद्या देशावर आक्रमण केले जात आहे ते शांतता प्रस्थापित करण्यासाठी कारण इतर लोक वा शासन परिस्थिती योग्यरित्या हाताळू शकत नाही म्हणून आक्रमण केले जाते, परंतु मी अधिकारी असतो तर काही वेगळे घडले असते. म्हणजे संघर्षाचे हे एक कारण आहे. की मी कल्पना करतो की संघर्षाचा विरोध करुन मी त्याचा अंत करु शकतो. मला नेमकेपणाने बोट ठेवायचे नाहीये, पण एक उघड उदाहरण आपल्यासमोर आहे. ज्यांना संघर्षच हवा होता त्यांनी जाणीवपूर्वक संघर्ष निर्माण केला व त्याची पाठराखण केली. अमेरिकेने निर्माण केलेला हा संघर्ष त्यांच्या कल्पनेपलिकडे जाऊन एक मोठी समस्या बनला.

काय कारण होते संघर्षाचे? अनेकांचा विश्वास आहे की त्यामागे स्वार्थ हेच कारण होते. त्यांना गॅस आणि पेट्रोलवर आपली हुकूमत पाहीजे होती, पण त्यांना तसे सांगायचे नव्हते आणि इतर कोणते कारण देणे अधिक नैतिक व योग्य वाटले. आणि अर्थात त्या सर्वांचा शेवटी गोंधळच झाला. आपल्यापैकी अनेक लोक अशा छोट्या समस्या किंवा मोठ्या संघर्षात अडकतात जसे की इराक आणि मध्य आशिया आणि अशा काही गोष्टी मागे सोडून जातात ज्या नंतर सहजपणे पुसता येत नाहीत. संघर्षाचे कारण हे जसे सांगितले जाते तसे कधीच

नसते. लोकांना सांगितले जाते ते कारण वेगळेच असते. काहीही असो पण संघर्ष हा संघर्षच. म्हणून आपल्याला आपल्या मनातील संघर्षाचा जास्त काळजीपूर्वक विचार करायचा आहे कारण त्यामुळेच बाह्य जीवनातील संघर्ष निर्माण होतो. मला वाटते की हा विषय शांततेच्या फार जवळचा आहे. शांततेबाबत खुप काही बोलले जाते, आणि लोक म्हणतात की त्यांना शांतता हवी आहे. पण त्यानां खरोखरीच शांतता हवी आहे कां? आपल्याला अनुकूल असणाऱ्या स्थितीला लोक शांतता म्हणतात. शांतता हा बोलण्यासाठी खुप सोपा विषय आहे परंतु स्वत: करीता त्याची जाणीव होणे कठीण आहे. ही शांतता म्हणजे केवळ वरवरची नव्हे तर अशी शांतता जिथे संघर्षाची स्थिती होणे अशक्य असते. मला याप्रसंगी भगवान बौद्ध आणि अंगुलीमाल यांच्या भेटीची कथा आठवते. अंगुलीमाल हा एक दानव होता. प्रतिस्पर्ध्याचे शिर कापून त्याच्यावर मात करण्याची त्याची रीत होती. प्रत्येक खूनामागे तो एक बोट (अंगूली) जमा करत असे व अशी एक माळच त्याने तयार केली होती. भगवान बौद्ध जंगलातून जाणार असल्याचे त्याला कळले व ही उत्तम संधी आहे असा विचार करुन अंगूलीमाल त्यांना भेटायला आला. त्याला पाहताच सर्व साधू पळून गेले व भगवान बौद्ध एकटेच राहीले. अंगुलीमालला त्यांच्याच शांती आणि आनंद यातून भरुन आलेला जाणवला. भगवान बौद्धांशी केलेल्या संवादातून त्याच्या लक्षात आले की त्याचा मार्ग कसा चुकीचा होता व भगवान बौद्ध कसे योग्य होते. आत्मज्ञानामुळे ते इतरांपेक्षा वेगळे होते. आपण सर्वच या कथेकडे आवडीने बघतो. पुढे हाच अंगूलीमाल त्यांचा शिष्य झाला विविध प्रकारच्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या दु:खावर उपाय आपल्याला खरोखर माहीत आहे कां? मी फार तपशीलात जात नाही पण संघर्ष परस्परांपासून वेगळे वाटत असले तरी त्या सर्वांचा स्त्रोत एकच आहे. आपण जर हे मूळ शोधू शकलो, केवळ तात्त्विकदृष्ट्या बोलून नव्हे तर प्रत्यक्ष शोधू शकलो तर आपण प्रत्येक प्रकारचा संघर्ष संपवू शकतो. खऱ्या अर्थाने अध्यात्मिक असणाऱ्या लोकांना कोणताही संघर्ष नसतो. इतर लोकांना त्यांच्याशी व त्यांच्या आदर्शाशी संघर्ष असतो. त्यांना आध्यात्मिक लोकांनी बदलावे असे वाटत असते. मात्र त्यांना बदलाची काहीही गरज नसते.

कोणत्याही कारणाने बिघडू शकत नाही अशी ही कोणती शांती आहे? आपणा सर्वांना वरवरची शांती परिचयाची आहे, ती संघर्षाच्याद्वारा सपू शकते किंवा आपल्याला संघर्षाची जाणीव होत नाही अशा वरकरणी असणाऱ्या संघर्षामुळेही अशी शांती ही बाह्यस्वरुपाची असते व एखाद्या संघर्षापासून ती मुक्त रहू शकत नाही मात्र अशी शांती जिचा बाह्य भौतिकबाबींशी काहीही संबंध नसतो ती मुक्त शांती असते. आपल्याकडे ऑर्डर ऑफ सर्व्हिस आहे आणि अनेक लोकांना असे वाटते की ऑर्डर ऑफ सर्व्हिसचा प्रसार सर्वत्र झाला की कोणतीही समस्या राहणार नाही. ऑर्डर ऑफ सर्व्हिस विविध प्रकारे जगाच्या विविध भागात पसरली आहे, तथापि समस्या आहेतच. पण जेव्हा भगवान बौद्ध लोकांना भेटतात तेव्हा कोणताही संघर्ष रहात नाही.

इतर लोकांवर अवलंबून राहण्याची स्थिती नसणे हि संघर्षापासून खरी मुक्ती आहे. एखादी एकटी व्यक्ती एवढी शांतीपूर्ण असू शकते, अगदी कोणत्याही परिस्थितीत, की कोणतीही समस्या सहज सुटू शकते. अशा प्रकारची शांती शोधणे कठीण आहे, पण दीर्घ काळापासून ती अस्तित्वात आहे. जेजस ख्राईस्टचे काही शब्द याची साक्ष देतात. काही शब्दांना वैश्विक मूल्य असते. जी व्यक्ती अशा लोकांबाबतही दयाळू असते ज्यांना शांती या शब्दाचा अर्थही माहीत नसतो, ती व्यक्ती हजारो लोकांना प्रभावित करुन जाते. बौद्ध, ख्रिस्त ही अशी उदाहरणे आहेत ज्यांनी मानवाला असा मार्ग दाखवला, जो शांती, प्रेम, चांगुलपणा यांनी परिपूर्ण असतो त्यामार्गावर इतर कोणत्याही गोष्टीला महत्त्व असत नाही. म्हणूनच कदाचित वेदांतामध्ये जगाला मिथ्या समजले आहे. कारण ते अशाश्वत आहे. जे शाश्वत असते तेच सत्य असते. म्हणून आपल्याला संघर्ष काय असतो, शांती काय असते व इतर सर्व नष्ट झाल्यावरही टिकून असते ते काय असते याचा विचार केला पाहीजे.

(The Indian Theosophist Nov. 23 मध्ये पुनर्मुद्रित लेखाचा अनुवाद)

**– बंधु डॉ. श्रीकांत उखळकर, अकोला.**

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन वार्ता

१. बंधू संजय पोटे ह्यांनी दि. ११ जानेवारी २०२४ रोजी धंतोली लॉज नागपूर येथे लॉज च्या कार्यकारिणीची सभा घेतली. लॉज सचिव बंधू मिलिंद जोशी ह्यांनी लॉजच्या उपक्रमांची माहिती दिली. लॉजच्या ढासळत्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट व्हावे अशी सूचना बंधू पोटे ह्यांनी केली त्यानुसार दि.४ फेब्रुवारी रोजी अहवाल मिळाला असून लॉजच्या रिपेअर आणि देखभालीसाठी खूप खर्च येणार असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. भोवाली (उत्तराखंड) येथील मे महिन्यात होणाऱ्या अभ्यास वर्गाचे नियोजन ठरविण्यात आले.

बंधू प्रदीप गोहिल जी पुणे लॉज मध्ये मार्गदर्शन करतांना-



२. बंधू संजय पोटे ह्यांनी दि. १२ जानेवारी रोजी मैत्रेय लॉज नागपूर येथे कार्यकारिणी आणि सभासदांची सभा घेतली. लॉज चे कार्यक्रम नियमित चालत असल्याची माहिती मिळाली. लॉज अध्यक्षा भगिनी मेहेत्रे ह्यांनी लॉजच्या इमारतीचे भाडेपट्ट्यासंबंधी करावयाच्या कामाची माहिती दिली तसेच लॉजच्या वास्तूच्या देखभालीसाठी आणि रिपेअर साठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. बंधू मानकर ह्यांनी सामुदायिक भारत समाज पूजा केली. तीन वक्त्यांनी थिऑसॉफी संबंधीचे त्यांचे विचार मांडले. सात नवीन सभासद अर्ज फेडरेशनकडे पाठविण्यात आले.

३. बंधू संजय पोटे ह्यांनी दि. १३ जानेवारी रोजी अकोट लॉजला भेट दिली. दोन नवीन सभासद अर्ज घेण्यात आले. लॉजमध्ये साफसफाई करण्यात आली. बरेच महिन्यांपासून तेथे कार्यक्रम झालेले नाहीत.

४. बंधू संजय पोटे ह्यांनी दि. २८ जानेवारी रोजी अकोला लॉजच्या कार्यकारिणी व सभासद सोबत चर्चा केली. लॉज ने महाविद्यालयीन विध्यार्थी आणि खुली निबंधस्पर्धा आयोजित केली असून ह्या स्पर्धेमध्ये ६० हुन अधिक स्पर्धकांनी भाग घेतल्याचे स्पर्धा प्रमुख बंधू उखळकर ह्यांनी सांगितले. स्पर्धा वितरण दि. १८ फेब्रुवारी रोजी लॉजमध्ये संपन्न होणार आहे. हि स्पर्धा टी वो एस ग्रुप च्या सहकार्याने घेण्यात आली. लॉजमध्ये प्रत्येक रविवारी कार्यक्रम व व्याख्याने होत असतात असे लॉज अध्यक्ष बंधू प्रा. सोनोने ह्यांनी सांगितले.

५. बंधू संजय पोटे ह्यांनी श्रीकृष्ण लॉज अमरावती येथील अभ्यास वर्गामध्ये हजेरी लावली. राष्ट्रीय व्याख्याते बंधू पांडे ह्यांनी घेतलेल्या पाच दिवसीय आभासवर्गाच्या समारोपाच्या दिवशी बंधू पोटे ह्यांनी तेथे उपस्थित सभासदांशी चर्चा केली.

मैत्रेय लॉज नागपूर-



६. दि. ३ फेब्रुवारी रोजी बंधू संजय पोटे, बंधू प्रा. सोनोने आणि बंधू प्रा. उखळकर ह्यांनी सेलू (वर्धा) येथील यशवंत जुनिअर आणि सिनिअर महाविद्यालयाला भेट दिली आणि ह्या महाविद्यालयाशी थिऑसॉफिकल

श्रीकृष्ण लॉज अमरावती –



उपक्रम राबविण्यासाठीचा करार केला आणि उपस्थित नवीन सभासदांना मार्गदर्शन केले. तेथील प्राचार्य काळे ह्यांनी साधन चतुष्टय ह्या पुस्तकाविषयी उदबोधन केले. तेथील लॉज चे पुनर्जीवन करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

७. बंधू भडभडे, फेडरेशन सचिव, हे गेली तीन महिन्यापासून 'चला थिऑसॉफी वाचू या' ह्या ऑनलाईन कार्यक्रमाचे संचलन करीत आहेत. प्रत्येक शुक्रवारी रात्री ९ ते १० ह्या वेळात ऑनलाईन पद्धतीने झूम मंचावर थिऑसॉफीच्या एका इंग्रजी पुस्तकाचे वाचन करण्यात येते आणि त्याचा भावार्थ/ अर्थ हा मराठीत सांगण्यात येतो. प्रत्येक शुक्रवारी त्या पुस्तकातील पाने क्रमाक्रमाने वाचली जातात. भगिनी रशिदा आणि मृणाल जोशी ह्यांची मदत पुस्तक वाचण्यात व भाषांतरात होत असते. हा कार्यक्रम थिऑसॉफीच्या अभ्यासकांसाठी अतिशय उपयुक्त आहे.

८. दि. २४ डिसेंबर २०२३ रोजी म. थी.फे. कार्यकारिणीची त्रैमासिक सभा ऑनलाईन पद्धतीने पार पडली. इंडियन सेक्शन, वाराणसी ने दिलेल्या स्मार्ट गोल्सची माहिती देण्यात आली. सन २०१९ पासून च्या प्रलंबित जमा-खर्च ताळेबंद आणि ऑडिट रिपोर्ट ला मंजुरी देण्यात आली. फेडरेशनची नोंदणी धर्मादाय आयुक्त कार्यालयात करून घ्यावी असे पुनश्च ठरले. ८. दि. २४ डिसेंबर २०२३ रोजी म. थी.फे. कार्यकारिणीची त्रैमासिक सभा ऑनलाईन पद्धतीने पार पडली. इंडियन सेक्शन, वाराणसी ने दिलेल्या स्मार्ट गोल्सची माहिती देण्यात आली. सन २०१९ पासून च्या प्रलंबित जमा-खर्च ताळेबंद आणि ऑडिट रिपोर्ट ला मंजुरी देण्यात आली. फेडरेशनची नोंदणी धर्मादाय आयुक्त कार्यालयात करून घ्यावी असे पुनश्च ठरले.

९. भोवाली येथे दि २६ ते ३१ मे दरम्यान होणाऱ्या अभ्यासवर्गाला बंधू मिलिंद जोशी हे मुख्य व्याख्याते म्हणून असतील आणिबंधू सुनील वाग्देव आणि भगिनी डॉ. मंजुषा वानखडे हे सहायोगी व्याख्याते म्हणून असतील असे ठरले. अभ्यासवर्गाचा विषय 'कर्माचा सिद्धांत' असा आहे. हा अभ्यासवर्ग एक नाविन्यपूर्ण उपक्रम असेल कारण ह्या अभ्यास वर्गाला युवा-शिबीर (युथ कॅम्प) असे संबोधण्यात आले आहे.

ह्या अभ्यासवर्गासाठी एकूण ४८ जणांची नोंदणी झाली आहे. भोवली येथे ४८ जणांची राहण्याची व्यवस्था आहे असे कळते. अश्याप्रकारे संपूर्ण उपस्थिती राहणार आहे. अभ्यासवर्गाची नोंदणी करणाऱ्यांपैकी ३८ जण हे वय वर्षे ४० हुन कमी वयाचे आहेत आणि

अकोला लॉज मध्ये नवीन सदस्यांचे स्वागत-



२७ जण हे ३० वर्षांहून कमी वयाचे आहेत. मराठी फेडरेशन ने ५ जणांची जाण्या, येण्याची व तेथील निवासी खर्च व जेवण ह्याचा खर्च दिला आहे. युवा वर्गातील उत्कृष्ट युवा सभासद म्हणून ह्या पाच जणांची निवडसमितीने निवड केली होती आणि आळंदी येथील अधिवेशनामध्ये तसे जाहीररित्या सांगण्यात आले होते.

१० अड्यार डे निमित्याने दि. १७ फेब्रुवारी रोजी ऑनलाईन लघु-व्याख्याने आयोजित केली आहेत. ह्यादिवशी सकाळी १० ते ११.३० वा. हि व्याख्याने पूना लॉज येथून प्रक्षेपित होतील. ह्या कार्यक्रमाची ऑनलाईन लिंक दोन दिवस अगोदर सर्व सभासदांना मोबाईलद्वारे पाठविण्यात येईल. बंधू जितेंद्र ठाकूर, बंधू कौस्तुभ भडभडे, बंधू तेंडुलकर, बंधू उखळकर, बंधू प्रा. सोनोने आणि बंधू मिलिंद जोशी हे व्याख्यानाद्वारे आपापले विचार प्रकट करतील.

११. फेडरेशन आणि टी.वो.एस. अकोलाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि सर्वांसाठी खुली निबंधस्पर्धा जानेवारी महिन्यात आयोजित केली होती. माझ्या कल्पनेतील २०४७ साचा भारत देश, अध्यात्माचे वैज्ञानिक स्वरूप, कृत्रिम बुद्धिमत्तेचे मानवासमोरील आव्हाने, आणि महिला आरक्षण आणि सबलीकरण असे चार विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहायचा होता. स्पर्धेसाठी प्रथम पाच उत्कृष्ट निबंधांना रोख पारितोषिके उत्तेजनार्थ पारितोषिके आणि सर्वांना प्रमाणपत्रे देण्यात येतील. ह्या स्पर्धेसाठी एकूण ६२ निबंध प्राप्त झाले. निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अकोला लॉज येथे दि. १८ फेब्रुवारी ला अड्यार डे च्या निमित्याने आयोजित केला आहे.

१२. फेडरेशन आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती च्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि सर्वांसाठी खुली निबंधस्पर्धा फेब्रुवारी महिन्यात आयोजित केली आहे. ह्या स्पर्धेचा बक्षीस समारंभ श्रीकृष्ण लॉज अमरावती येथे करण्याचा मानस आहे.

१३. पुढील लॉजेस मधून थिऑसॉफिकल सोसायटीच्या नवीन सभासदत्वाचे काही अर्ज प्राप्त झाले आहेत. श्रीकृष्ण लॉज अमरावती, मैत्रेय लॉज नागपूर, धंतोली लॉज नागपूर, पुणे लॉज, अकोट लॉज, ठाणे लॉज, आणि अकोला लॉज. विशेषतः: अकोला लॉज येथील एकूण सदस्य संख्या १०० च्या वर जात आहे हे नमूद करावेसे वाटते. नाशिक लॉज येथे सदस्य संख्या वाढण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत.

---

# लॉज वार्ता :
# मैत्रेय लॉज हनुमान नगर, नागपूर

थिऑसाफिकल सोसायटी मैत्रेय लॉज हनुमान नगर नागपूर च्या अध्यक्ष डॉ स्मिता मेहेत्रे यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम राबविले जातात. रक्षाबंधन, अनाथाश्रमात अन्नदान,सहल, वाढदिवस , योगासने,विविध विषयांवर चर्चा, परिसंवाद ,मराठी थिऑसाफिकल फेडरेशनचे अध्यक्ष बंधू संजय पोटे यांच्या अध्यक्षतेखाली सेमिनार, तसेच थिऑसाफीच्या विविध घटकांवर डॉ स्मिता मेहेत्रे, ओंकार बोराडे,वागदेव, निशिकांत मेहेत्रे, डॉ  हरीश कळमकर आदी प्रकाश टाकतात.अतिशय स्तुत्य उपक्रम राबविले जातात.सर्व भगिनींना आपले विचार व्यक्त करण्याची संधी दिली जाते. भगिनी सुनंदा जांबुतकर, वंदना क्षिरसागर, कल्पना कडू, रेणुका जोशी, विद्या सुरकार, किर्ती दारोडकर, शितल बनसोड, पद्मजा बनसोड, केतकी कडू, ॲड.रोमा खंडवाणी, ॲड.अंकिता शर्मा, डॉ.ऋतूजा गोमासे,शारदा हाडगे,विमल वाघमारे,शोभा येवले,सुनंदा सुपारे, जयश्री मोहितकर,सुमन गान, विजया दहीकर, उज्वला पाटील, मंगला ठाकरे,बंधू भालचंद्र मानकर, प्रियदर्शन कडू, ॲड.अक्षय मेहेत्रे, ॲड.रविंद्र सुपारे,मदन गान,प्रविण पांडे,पंकज शर्मा आदींचे मोलाचे सहकार्य लाभते.

# पुणे लॉज वार्ता

१. लॉजच्या इमारतीचे रंगकाम (आतून व बाहेरून ) करण्यात आले. एक महिन्यापेक्षा जास्त वेळ ह्या कामासाठी लागला परंतु लॉजचे कार्यक्रम व अभ्यासवर्ग नियमितपणे सुरु होते.

२. लॉज 'वाय-फाय' करण्यात आलेला आहे. इंटरनेटच्या सोयीमुळे तसेच ऑनलाईन 'झूम'च्या चोवीस तास उपलबभते मुळे लॉजमध्ये ऑनलाईन कार्यक्रम कोणत्याही वेळी आणि कितीही तास घेण्याची सुविधा मिळाली आहे. लॉज चे सभासद लॉज पासून बरेच लांब राहतात त्यांना काही कार्यक्रमात ऑनलाईन हजेरी लावता येईल. ह्याचा उपयोग मराठी फेडेरेशनला देखील होणार आहे.

३. इंडियन सेक्शन थिऑसॉफिकल सोसायटी,वाराणसी चे अध्यक्ष बंधू प्रदीप गोहिल ह्यांनी लॉजला दि.१४ जानेवारीला भेट दिली. लॉजची सुस्थिती आणि कार्यक्रमांची नियमितता ह्याची माहिती घेतली. दुसरे दिवशी सकाळी लॉज सभासदांसोबत त्यांनी नाश्ता व चहापाणी घेतले. त्यानंतर डॉ. ॲनी बेझन्ट ह्यांच्या वाराणसी येथील वास्तव्यावर त्यांचे भाषण झाले. मराठी फेडेरेशनच्या कामाचे त्यांनी सर्वांसमक्ष कौतुक केले.

४. लॉजच्या सदस्या भगिनी विद्वान्स ह्यांनी स्वप्रेरणेने 'मास्टर्स ' ह्या इंग्रजी पुस्तकाचे मराठीमध्ये भाषांतर करण्याचे कार्य सुरु केले आहे.

५. प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी सायंकाळी बंधू बुरसे ह्यांचे मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अभ्यासवर्गात नियमितपणे ६ ते १० सभासद हजर असतात.

६. राष्ट्रीय व्याख्याते व लॉजचे उपाध्यक्ष बंधू तेंडुलकर ह्यांच्या संकल्पनेतून व बंधू भडभडे व बंधू पोटे ह्यांच्या सहकार्यातून आत्म-विद्या (ब्रह्म-विद्या) ह्या विषयावर साधारण २० तासाचा कोर्स तयार करण्यात आला असून गेल्या दोन महिन्यांपासून प्रत्येक शनिवारी व रविवारी हा कोर्स घेण्यात येतो. ह्या कोर्सचे व्हिडिवो रेकॉर्डिंग करण्यात येत आहे. हा कोर्स अध्यात्मिक आवड असणाऱ्या कोणत्याही वयाच्या सर्वसामान्य व्यक्तींना तसेच थिऑसॉफीच्या सभासदांना उपयुक्त आहे. मागील सहा महिन्यापासून बंधू तेंडुलकर ह्या विषयावर लेक्चर्स घेत आहेत.

७. लॉजचा १४३ वा वर्धापन-दिन दि.२८ जानेवारी रोजी संपन्न झाला. ह्यानिमित्य आयोजित कार्यक्रमात बंधू बुरसे ह्यांनी लॉजचा इतिहास प्रस्तुत केला. बंधू शर्मा, बंधू सिनारे, भ.जोशी ह्यांनी त्यांचे विचार मांडलेत. लॉज सचिव बंधू भडभडे ह्यांनी कार्यक्रमाचे संचलन केले. एका जेष्ठ सभासदांकडून लॉजसाठी साऊंड-सिस्टीम भेटी





देण्यात आली.

८. लॉजचे क्रियाशील सभासद बंधू पालकृत व सचिव बंधू भडभडे हे नुकतेच संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात उपस्थित होते. ह्या अधिवेशनात अड्यार येथील मुख्यालयात त्यांनी भारत-समाज पूजा घेतली. लॉज मध्ये व शहरामध्ये इतरत्र ही पूजा बंधू भडभडे ह्यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात येत असते.

९. लॉजमध्ये अड्यार येथील थिऑसीफिकल पब्लिशिंग हाऊस मधून अनेक पुतकांची खरेदी करण्यात येते. लॉजचे वाचनालय अद्यावत करण्यासाठी 'डेटा-एंट्री'चे कार्य सुरु आहे. भगिनी जाधव ह्यांचे लायब्ररी कामासाठी सहकार्य मिळत असते.

१०. थिऑसीफिकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस (टी.ओ.एस.)पूणे ग्रुप ने नुकतीच ग्रामीण व दुर्गम भागातील प्राथमिक शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून दिले आहे. जि.प.च्या तीन वेगवेगळ्या शाळांमध्ये ५४ गरजू विद्यार्थ्यांना ही मदत देण्यात आली. तेथील शाळा प्रमुखांनी शालेय साहित्य मिळण्याबाबत टी.ओ.एस. ग्रुपला कळविले होते. येथील दोन शिक्षिकांनी टी.ओ.एस. च्या समजसेवी कार्याने प्रभावीत होऊन संस्थेचे चे आजीवन घेतले.

---

## अमरावती लॉज

बंधु श्री उमा शंकरजी पांडे, राष्ट्रीय व्याख्याते, वाराणसी यांचे श्रीकृष्ण थिऑसॉफिकल सोसायटी (जोशी हॉल) अमरावती येथे दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी आगमन झाले व त्याच दिवशी दुपारी प्रॉजेक्टरवर ध्यान व बॉडी स्कॅनिंग शिकविले. त्यानंतर दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत थिऑसॉफिकल ब्लूम्स या त्यांच्या पुस्तकातील विविध विषयांवर त्यांनी अभ्यास वर्ग घेतला.

सदर अभ्यास वर्गास सोसायटीचे सर्व पदाधिकारी, बंधु श्री मधुकरराव वानखडे, बंधु श्री. माधव वेरुळकर, बंधु श्री. नितीन राऊत, बंधु श्री. माधव बोबडे, बंधु श्री. प्रकाश पाचपोर, भगिनी मिनाक्षी वानखडे, भगिनी मंजूषा वानखडे, भगिनी सुनिता काजळे, भगिनी कुसूम पाचपोर, भगिनी विमल राऊत तसेच इतर सभासद व ग्रामस्थ जवळपास ३० व्यक्ती उपस्थित होते. विशेष म्हणजे या अभ्यास वर्गास उपस्थितांसाठी चहा, नाश्ता, जेवण व राहण्याची विनामूल्य आयोजन करण्यात आले होते.

अभ्यास वर्ग चालु असताना अकोला येथील बंधु श्री. एन. एन. राऊत आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे अध्यक्ष बंधु श्री. संजयजी पोटे यांनी सदिच्छा भेटी दिल्यात.

## धंतोली, नागपूर लॉज

दर रविवारी साप्ताहीक सभेची सुरवात स. ७.३० वा. हिंदू सामूदायिक पूजेने केली जाते. शरयू वाग्देव, वेद वैद्य, सोहम येडे आणि आदिती अंबूलकर हे तरुण सदस्य पूजा करतात

आक्टोबर २०२३

भगिनी विद्यालक्ष्मी देवगडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१/१०/२३ रोजी ॲनी बेझंट डे साजरा करण्यात आला. बंधू वै. बी. धारस्कर याप्रसंगी प्रमुख वक्ते होते. लॉजच्या नवयुवक सदस्यांनी आपल्या भाषणातून ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकला.

दि. ८,१५,२२ आणि २९ आक्टोबर रोजी बंधू मिलींद जोशी, लॉज सचिव यांनी भगवत् गितेच्या ९ व्या अध्यायावर व्याख्यान दिले.

नोव्हेंबर २०२३

दि. १७/११/२०२३ रोजी स्थापना दिवस कार्यक्रम ऑनलाईन संध्याकाळी ८ वा. घेण्यात आला. नोव्हेंबरच्या व्याख्यान मालिकेची तयारी करण्यात आली.

दिवाळीचा रविवार वगळता सर्व रविवारी Young Indian Theosophists Symposium ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. यामध्ये १६ वर्षे दरम्यान वयाच्या ११ युवकांनी सहभाग घेतला ज्यामध्ये शरयू वाग्देव, वेद वैद्य, सोहम येडे आणि आदिती अंबूलकर या नागपूर लॉजच्या चार युवकांचा समावेश होता. सर्व सहभागी युवकांची तयारी ०६ मार्गदर्शकांनी करुन घेतली ज्यामध्ये नागपूर लॉजच्या सुनिल वाग्देव, मिलींद जोशी, मिनाक्षी गायधनी आणि प्रिती वाग्देव यांचा समावेश होता.

डिसेंबर २०२३

दि. ०३/१२/२३ व १०/१२/२४ रोजी बंधू सूनिल वाग्देव यांनी आध्यात्मिक जीवन ह्या विषयावर व्याख्यान दिले. सर्व सभांचा समारोप ऑनलाईन निर्देशित ध्यानाने झाला. बंधू ए.पी. लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

## आनंद लॉज, मिरज

आनंद लॉज, श्रीकृष्ण रेसिडेन्सी तिसरा मजला क्र. ९ श्रीराम मार्ग ब्राम्हणपूरी मिरज येथे दर शनिवारी सायंकाळी ५ वाजता सभा असते.

१) सदर सभेला ८ ते १० सदस्य उपस्थित असतात. थिऑसॉफिच्या विषयावर र्चा होतात. काही सभासदांच्या शंकाचे निरसन केले जाते. तसेच एखादे पुस्तक वाचनासाठी घेतले जाते. त्यावर चर्चा होते सध्या 'मुक्ती' मंदिराच्या प्रांगणात या पुस्तकाचे वाचन सुरु आहे.

२) दर रविवारी सकाळी ९ ते ११ सांगली लॉजला E.S. Meeting असते. मिरज लॉजचे ४ सभासद E.S. मध्ये आहेत. तसेच प्रा. भिरजकर भारत समाजपूजा घेतात. तसे रोगनिवारणविधी घेतला जातो. तिथेही पुस्तक वाचन चर्चा असते.

अध्यक्ष – श्री डी. एन. कारखानीस

सेक्रेटरी – प्रा. सी. एस. मिरजकर

कोषाध्यक्ष – ओ. एच. चिल्लाळ

# थिऑसोफिकल सोसायटी मैत्रेय लॉजची एक दिवसीय सहल यशस्वी




शब्द्रहित्य/नागपूर- चिऑसोफिकल सोसायटी मैत्रेय लॉज तर्फ अध्यक्षा डॉ. स्मिता निशिकांत मेहेत्रे यांच्या नेतृत्वात कोटेश्वर, पवनार, सेवाग्राम, केळझर, बृहस्पती मंदिर चौकी येथे एक दिवसीय सहल यशस्वीपणे संपन्न झाली. यात ५० थिऑसीफिस्ट बंधु भगिनी सहभागी झालेत. सेवाग्राम येथे मनीपुर घटनेसंबंधित भगिनींनी निषेध नोंदविला. सहलीच्या यशस्वीतेसाठी निशिकांत मेहेत्रे, प्रणोती कळमकर, सुनंदा जांबुतकर, गाण सर, शारदा हाडगे, सुपारे सर, डॉ. कळमकर यांनी सहकार्य केले.



**जि.प. प्राथमिक शाळा काळेवाडी गंगापूर (बु.) ता. आंबेगांव जि. पुणे येथे शालेय साहित्य वाटप**

TheHitavada

Vidarbha Line | 2024-01-04 | Page- 2

ehitavada.com

# TOS' noble gesture towards tribals



TOS member distributing blanket to a tribal.

■ **District Correspondent**

AKOLA, Jan 3

AS A noble gesture to the tribal brothers Akola unit of Theosophical Order of Service (TOS) distributed 51 blankets to tribal brethren in village Chunakhedi near Hiwarkhed on the occasion of New Year celebrations. The blankets were donated to TOS by Shivprakashseth Sawal.

TOS Chitrak Group, Akola, organises charitable activities for the needy. To welcome the New Year the members led by Dr Ashok Sonone, President of Theosophical Lodge, Akola, went to tribal village of Chunakhedi near Hiwarkhed in Telhara tehsil.

The tribal families were distributed woollen blankets. Dr Shrikant Ukhalkar, President of TOS, Akola, took lead for the activity. Harishchandra Pise, Raju Ukhalkar, Pradip Awachar, Mukund Kulkarni, Kulkarni, Anushri Ukhalkar, Mahendra Wakare, Wakare, Yogesh Gadge and Uttamrao Nalkande participated in the activity.

Chitrak Group, Akola, also holds free medical check-up camps and books donation in ZP Primary Schools every month under the guidance of Adv Sanjay Potey, President of Maharashtra TOS.

दै. सकाळ दि. २३/१२/२३



**वास्तवभान**

**प्रा. डॉ. किरण वाघमारे**

# चला इथे लावू आशेची पणती



**आज आम्ही विकासाच्या गप्पा मारत आहोत. जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून आम्ही स्थान प्राप्त केल्याचा गवगवा सध्या सर्वत्र सुरू आहे. लवकरच आम्ही तिसरा क्रमांक मिळवणार असल्याचे सांगितले जाते. एकीकडे आम्ही प्रगती करीत असताना दुसरीकडे मात्र आम्ही पाषाणयुगात आहोत, अशी स्थिती आहे. याचा विचार आपण करणार आहोत की नाही?**

देशाची आर्थिक प्रगती आनंददायी बाब आहे. परंतु काही लोक आर्थिकदृष्ट्या सुदृढ झाले म्हणजे संपूर्ण देश आर्थिक संपन्न झाला, असे होत नाही. हे आम्हाला समजून घ्यावे लागेल. एकीकडे पैशांची पाण्यासारखी उधळण करणारा एक मोठा वर्ग आहे तर दुसरीकडे प्राथमिक सुविधासुद्धा मिळत नसल्याने हालाखीचे जीवन जगणारा समाज आहे. हा टोकाचा विरोधाभास आम्ही केव्हा लक्षात घेणार आहोत.

भारतातील सर्व सुखसोयींनी सज्ज आहे असे नाही. एकीकडे आम्हाला महानगरातील डोळे दिपवणारा विकास आकर्षित करीत आहे; मात्र दुसरीकडे प्राथमिक गरजासुद्धा पूर्ण न होऊ शकलेल्या मोठ्या वर्गाकडे पाहून आमचे डोळे का उघडत नाही, हा प्रश्न आहे. आम्ही थिऑसॉफिकल सोसायटीच्या माध्यमातून दिवाळीच्या पर्वावर मेळघाटमधील अतिशय दुर्गम भागात जाऊन आलो. मेळघाटमधील रेटाखेडा अतिशय दुर्गम गाव. या गावात आम्ही अनेक अडथळे पार करून पोहोचलो. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आम्ही मोठ्या थाटात साजरा केला; परंतु रेटाखेडा गावात स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर रहदारीसाठी रस्ता नाही. अकोल्याहून येथे पोहोचण्यासाठी आम्हाला सात तास लागले. सेमाडोह ते रेटाखेडा हे ३० किमीचे अंतर जाण्यासाठी तब्बल साडेतीन तास लागले. या ठिकाणी अत्यंत प्रतिकूल वातावरण आहे. पायवाट तुडवतच जावे लागते. वाटेत मोठमोठे दगड, खड्डे, काटेरी झुडपं हे अडथळे पार करून येथे पोहोचावे लागते. प्रचंड जंगल, वन्यप्राण्यांची दहशत अशा वातावरणात आदिवासी कसे राहत असतील? त्यांच्या वाट्याला अतिशय खडतर जीवन आले आहे. शेती अत्यल्प आहे. जंगलातील वनस्पती, मध, मोहफुले, लाकडे हेच उपजीविकेचे साधन. मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे कायद्याचे मोठे बंधन. या बंधनांना तोडले तर कारवाईचा बडगा अशा विचित्र अवस्थेत हे आदिवासी बांधव उदारनिर्वाह करतात. येथे लाईट नाही. विजेचा कुठलाही संपर्क या गावकऱ्यांना नाही. मध्यप्रदेशातून सौरऊर्जेवर चालणारे लाईट सुरू करण्यात आले होते. परंतु तेही आता बंद पडले आहेत. अंधाराच्या सोबतीने या घनदाट अरण्यात आदिवासींना अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगावे लागते. आज आपण लाईटशिवाय जगण्याची कल्पनाच करू शकत नाही. मग हे आदिवासी बांधव कसे जगत असतील, याची कल्पनाच करवत नाही. आदिवासींची सर्वात महत्त्वाची निकड लक्षात घेऊनच आम्ही येथे सौर कंदिलाचे वाटप केले. या आदिवासींच्या जीवनात पूर्णपणे प्रकाश निर्माण करू शकलो नाही; मात्र एक आशेची पणती आम्ही लावून आलो.

आज आदिवासींच्या नावावर शेकडो योजना आहेत; परंतु त्याचा लाभ घेतो कोण? ज्यांना खऱ्या अर्थाने गरज आहे त्यांच्यापर्यंत त्या पोहोचल्या नाही. ज्यांनी आम्हाला निसर्गाशी एकरूप होणं शिकवलं त्याच निसर्गपूजक आदिवासी समाजाप्रती उदासीन आहोत. रेटाखेडासारखी अनेक गावे देशात आहेत. या गावांपर्यंत आम्ही कधी जाऊन पोहोचणार? मध्यंतरी मंत्री आणि अधिकारी यांनी ग्रामीण भागात एक रात्र काढावी, असा उपक्रम राबविला गेला. या माध्यमातून ग्रामीण भागातील समस्या जाणून घेणे हा उद्देश होता. मात्र 'व्हिलेज टूर' नावाचा हा एक इव्हेंटच साजरा झाला. मंत्र्यांना आणि अधिकाऱ्यांना रेटाखेडासारख्या गावांमध्ये पाठविले पाहिजे. मग त्यांच्या खऱ्या अर्थाने समस्या लक्षात येतील. परंतु अशा ठिकाणी जाण्याची मानसिकता कोणाचीच नाही. गंमत म्हणजे रेटाखेडा गावच्या सरपंचदेखील या गावात जात नाही. आम्ही गेल्यानंतर त्यांना कळविले. तेव्हा त्या एक वर्षानंतर गावात आल्याचे समजले. आपल्या समाज बांधवांप्रती सरपंचांचीच एवढी उदासीनता असेल तर बाकी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांविषयी न बोललेच बरे. विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारत असताना आम्ही जरा आमच्या शेजारी लक्ष दिले पाहिजे. आमच्याकडील थोडं जरी या बांधवांच्या ताटात टाकलं तरी त्यांच पोट भरू शकतं. परंतु हे थोडसं टाकण्याची आमची सद्‌बुद्धी कधी जागृत होणार, हा प्रश्न आहे. परंतु मी निराश नाही. आशेची पणती अजूनही मनात तेवत आहे.

**श्री किसनलाल नथमल गोयनका महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशीम**
**मो.९८५०९०२१५४**



**दि. २० जानेवारी रोजी साने गुरुजी विद्यालय अकोला येथे पुस्तक संच भेट व मार्गदर्शन**

## परोपकारी व सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हा!

# थिऑसॉफीकल ऑर्डर ऑफ सर्व्हीस (टि. ओ. एस.)

A Union of those who love in the service of all that suffers

(पिडीतांच्या दुःख निवारण कार्यामध्ये आस्था असणाऱ्यांची संघटना)

**✻ संस्थापक ✻**

डॉ. ॲनी बेझंट

**✻ स्थापना ✻**

सन १९०८

**✻ व्याप्ती ✻**

आंतरराष्ट्रीय संस्था

(भारतामध्ये १८ पेक्षा जास्त राज्यांमध्ये कार्यरत)

**पार्श्वभूमी :**
थिऑसॉफीचा अर्थ दिव्यज्ञान, प्राप्तीसाठी आध्यात्मिक मुल्यांचा अभ्यास करावा लागतो. थिऑसॉफी बुद्धीवाद्यांचे तत्त्वज्ञान म्हणून न राहता ती आचरणीय व उद्‌बोधक जिवन प्रणाली व्हावी व ह्या साधनेला सेवेची जोड मिळाल्यामुळे परिपूर्ण दिव्यज्ञान होण्यास मदत व्हावी या हेतूने थिऑसॉफीकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस (टि. ओ. एस.) ची स्थापना झाली.
थिऑसॉफीच्या सभासदांसह समाजातील व्यक्तींनी सेवेचे व्रत अंगीकारावे व समस्याग्रस्तांना सेवा द्यावी हे अपेक्षित आहे. थिऑसॉफी विश्वबंधुत्वाचे नाते शिकविते तर टी. ओ. एस. विश्वबंधुत्वाचे आचरण शिकविते.
टि. ओ. एस. ही एक कटिबद्ध संघटना/संस्था आहे. दिव्यज्ञान हे त्याचे वर्म आहे, म्हणूनच समस्याग्रस्त मनुष्य, प्राणी, पक्षी, वनस्पती यासह संपूर्ण पर्यावरणाला प्रेम सलोखा, आरोग्य सेवा, ज्ञान सेवा, सांत्वना देणे इत्यादीचा टि. ओ. एस. च्या कार्याच्या व्याप्तीमध्ये समावेश आहे.

**उद्दीष्टये :** १) जगातील दुःख कमी करणे.
२) इतरांच्या सेवा कार्यात स्वतःला समर्पित करणे.
३) स्वार्थ व लोभ याचा त्याग करणे.
४) आपल्यातील उच्चतर जाणीवेच्या पातळीवर जगणे.

**सभासद पात्रता :** पिडाग्रस्त दीन, दुःखीतांबद्दल करुणा व सहानुभूती असणारी तसेच पिडीतांचे दुःख निवारण करण्यासाठी यथाशक्ती सेवा करण्यात तत्पर असणारी व्यक्ती.

**काही सेवाभावी उपक्रम :**
पैशाविना सेवाभावी उपक्रम राबविता येत नाही हा एक गैरसमज आहे. आपल्या शारिरीक, मानसिक व बौद्धिक क्षमतेचा वापर करुन सेवाभावी कृती होवू शकते ह्यासाठी खालील काही उदाहरणे –
१) गरजू ज्येष्ठ नागरिकांना विविध सेवा पुरविणे.
२) गरिब, अपंग व अनाथांना शिक्षण देणे/शिकविणे.
३) शासनाच्या कल्याणकारी योजनांचा गरजूंना लाभ मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे.
४) वनस्पती व वृक्ष लागवड, संवर्धन व संरक्षण.
५) विनामूल्य योग्य सल्ला व समुपदेशन.
६) पशू-पक्षांना आधार देणे व त्यांची हेळसांड थांबविणे.
७) सामूदायीक प्रार्थना व दुवा करणे (हीलिंग)
८) अपघातग्रस्त व चिंताग्रस्तांचे सांत्वन करणे.
९) रोगींना दवाखान्यात नेणे व योग्य मार्गदर्शन करणे. इत्यादि ......

**टि. ओ. एस. ची मुल्यतत्त्वे :**
**✻ जिवन एक आहे.**
**✻ जिवन अविभाज्य आहे.**
**✻ एकाच परमोच्च शक्तीचे चराचर सृष्टी हे प्रकटीकरण आहे.**
**✻ विश्वबंधुत्व-इतर माझेहून वेगळे नाहीत**

**टि. ओ. एस. चे वैशिष्ट्य :**
'निस्वार्थ सेवा' व 'सदाचार' कार्याभिमुखता व संवेदनशिलतेला प्राधान्य आहे.

**टि. ओ. एस. चे आंतरराष्ट्रीय कार्यालय :**
**पॅरीस (फ्रान्स)**

**टि. ओ. एस.चे राष्ट्रीय मुख्यालय :**
**वाराणसी (उत्तर प्रदेश)**

**टि. ओ. एस. चे महाराष्ट्राचे कार्यालय :**
**पुणे**

**टि. ओ. एस. चे ग्रुप्स व भ्रमणध्वनी क्रमांक :**

**१) पुणे :** ॲड. संजय पोटे
मो. : ९८२३७२४३७७

**२) नागपूर :** श्री. सुनिल वाग्देव
मो. : ९८५०९१९८८०

**३) मैत्रेय, नागपूर :** डॉ. स्मिताताई मेहेत्रे
मो. : ९८२३४१४८६५

**४) सांगली :** श्री. सुरेंद्र मळली
मो. : ९४२११२८२५५

**५) आकोट (अकोला) :** श्री. रविकांत पालखडे
मो. : ९०११०४४७१०

**६) अकोला :** डॉ. श्रीकांत उखळकर
मो. : ७०८३९४५७९९

**७) मालेगांव (नाशिक) :** श्री. श्यामलाल रोहिदास
मो. : ९४२२७६९८३८

**८) नंदूरबार :** श्री. शिवदास पवार
मो. : ९४२०३७४९७१

**९) अमरावती :** सौ. मंजुषाताई वानखडे
मो. : ८८३९०७८१७१

**१०) बेळगांव :** श्री. ज्योतीबा जाधव
मो. : ०९२४२३३५८३४

**११) पिंपरी चिंतवड, पुणे :** श्री. अरुण पालकृत
मो. : ९४२२०३६७०२

**१२) डोंबिवली :** श्री. प्रदीपकुमार जोशी
मो. : ९२२४६०६८५०

**सभासद प्रकार :**
**१) आजीव सभासद**
सहभाग राशी रु. ५५०/-

**२) आश्रयदाता सभासद**
सहभाग राशी रु. ११००/-

(सहभाग राशीमध्ये पोस्टेजचा खर्च समाविष्ट)

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
अध्यक्ष / सचिव
टि. ओ. एस. (महाराष्ट्र)
द्वारा : पुणे लॉज थिऑसॉफिकल सोसायटी,
९१८, गणेशवाडी, बी. एम. सि. सी. रोड,
डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००५

**भ्रमणध्वनी :**
ॲड. संजय पोटे, ९८२३७२४३७७
श्री. अरुण पालकृत, ९४२२०३६७०२

**ई-मेल :**
sanjaypotey@gmail.com

Only as we out in love
which seeks to help and serve
do we transcend ourselves and
develop that consciousness
which embodies the awareness of our
essential unity with others.

- N. Sri Ram